आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२१ जून २०२४ - शुक्रवार

गेल्या १० वर्षात योगाभ्यासाची व्याप्ती वाढली असून योग पर्यटनाविषयीचं आकर्षण वाढल्यामुळे लोक भारतात त्याचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यासाठी येतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. योग दिनाचा मुख्य समारंभ आज जम्मू काश्मीरात श्रीनगर इथं शेर ए काश्मीर आंतरराष्ट्रीय परिषद केंद्रात झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नायब राज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

योगाच्या अमूर्त ठेव्याचं रक्षण करणं आणि त्याचा प्रचार - प्रसार करणं हे प्रत्येक भारतीयाचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केलं. राजभवनमधे त्यांच्या उपस्थितीत योगसत्राचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते.

भारतीय जीवन शैलीची आयुर्वेद आणि योगा ही दोन विशेष अंग आहेत, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. गेट वे ऑफ इंडिया इथं आयोजित योग दिवसाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात सकाळी योगासन शिबिराचं आयोजन करण्यात आलं.

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी चारकोप मार्केट मध्ये झालेल्या कार्यक्रमात सहभागी होत योगासनं केली. दादरमध्ये आयोजित कार्यक्रमात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यातही आज सर्वत्र योग दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला.

**पुणे** विमानतळ परिसरात आयोजित योग दिन कार्यक्रमाला केंद्रीय सहकार तथा नागरी हवाई वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहळ उपस्थित होते.

**रत्नागिरी**, **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात मोठ्या उत्साहात योग दिन साजरा झाला.

**जळगाव** शहरात छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात दोन हजारापेक्षा अधिक खेळाडू, विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले होते.

**अहमदनगर** जिल्ह्यात योग शिक्षकांनी योगाचं महत्त्व सांगून प्रात्यक्षिकांद्वारे विविध आसनांबाबत मार्गदर्शन केलं.

**नागपूर, छत्रपती संभाजीनगर, वाशीम**, **हिंगोली, नांदेड, धुळे इथंही** योग दिवस साजरा झाला. **गडचिरोली**च्या गोंडवाना विद्यापीठात कुलगुरु डॉ.प्रशांत बोकारे यांच्या उपस्थितीत योगासनाचे धडे गिरवण्यात आले.

**<><><><><>**

ओबीसी उपोषणाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज संध्याकाळी बैठक बोलावली असून, यात जालना जिल्ह्यातल्या वडीगोद्री इथलं पाच सदस्यांचं शिष्टमंडळ सहभागी होणार आहे. राज्य सरकारच्या शिष्टमंडळानं आज वडीगोद्री इथं उपोषणाला बसलेले लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांची भेट घेतली. मंत्री गिरीश महाजन, उदय सामंत, अतुल सावे, खासदार संदीपान भुमरे, आमदार गोपीचंद पडळकर यांचा या शिष्टमंडळात समावेश आहे. यावेळी उपोषणकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांशी फोनवरुन संवाद साधला. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, हीच सरकारची भूमिका असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्रासह हरयाणा, झारखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये आगामी विधानसभा निवडणुकांसाठी तयारी सुरू केली आहे. हरयाणात ३ नोव्हेंबर रोजी, झारखंडमधे २६ नोव्हेंबर रोजी तर महाराष्ट्रात ५ जानेवारीला विद्यमान विधानसभेचा कार्यकाळ संपत असल्यामुळे तिथं निवडणुका

होत आहेत. तसंच जम्मू काश्मीर या केंद्रशासित प्रदेशातही विधानसभेसाठी निवडणूक होत आहे. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी दुसऱ्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमासाठी १ जुलै २०२४ हा अर्हता दिवस आहे. त्यापूर्वी मतदान केंद्र अधिकारी घरोघरी जाऊन मतदारांची नावं यादीत घेणं, दुबार आणि मृत झालेल्या मतदारांची नावं वगळणं यासारखी काम करणार आहेत. या सर्व प्रक्रिया झाल्यानंतर २५ जुलै रोजी मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध केला जाईल. त्याविषयीचे आक्षेप ध्यानात घेतल्यानंतर २० ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल.

**<><><><>**

१८व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ‘मिफ’चा समारोप आज होणार आहे. या महोत्सवात दिला जाणारा सर्वोत्कृष्ट माहितीपटासाठीचा सुवर्णशंख पुरस्कार कोणाला मिळणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. १० लाख रुपये रोख असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. मुंबईत संध्याकाळी होणाऱ्या समारोपाच्या कार्यक्रमात हा पुरस्कार दिला जाईल. दूरदर्शन आणि आकाशवाणीवरुन या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाईल.

**<><><><>**

**उत्तर म**हाराष्ट्रात नंदूरबार आणि धुळे जिल्ह्याचा काही भाग वगळता राज्यात सर्वत्र नैऋत्य मौसमी पावसाचं आगमन झालंय. **रत्नागिरीत** झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातल्या नद्यांची पाणीपातळी वाढली आहे. खेड तालुक्यात जगबुडी नदीची पाणी पातळी दुपारी बारा वाजता पावणे ४ मीटर्सवर होती. **पालघर** जिल्ह्यात काल मुसळधार पाऊस झाला. जिल्ह्यातल्या सूर्या, वैतरणा, देहर्जा नद्या ओसंडून वाहू लागल्या आहेत. यामुळे अनेक रस्ते पाण्याखाली गेले होते.

**//<><><><>//**